Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue - V February 2015
Theme - " Pedagogy And Teaching Learning "

# विषय शिक्षणातील अध्यापनशास्त्र आणि अध्ययनस्त्रोत

**प्रा. निलिमा निकम,**
**(प्र. प्राचार्या),**
**समर्थ शिक्षणशास्त्र महाविद्यालय, सातपूर, नाशिक**

***सारांश (Abstract)***

***अध्यापनात दोन, घटक महत्वाचे आहेत. विषयज्ञान आणि अध्यापन पध्दती शिक्षकाला विद्यार्थ्यापुढे आशयाचे योग्य पध्दतीने सादरीकरण करुन त्यांना इष्ट अनुभुती द्यायच्या असतात त्यातून अपेक्षित वर्तन बदल घडवून आणायचा असतो. आपले अध्यापन कार्य कसे अधिकाधिक प्रभावी व गुणवत्तापूर्ण कसे होईल याचा विचार शिक्षकाने सतत करायला हवा. म्हणूनच शिक्षकाने आपले अध्यापनकार्य प्रभावी करण्यासाठी अध्यापनशास्त्र व अध्ययनस्त्रोतांची योग्य सांगड घातल्यास शैक्षणिक वर्तनात योग्य इष्टबदल होण्यास वेळ लागणार नाही तसेच अध्ययन अध्यापनात नाविन्यता येईल व विद्यार्थ्यांची संपादणूक पातळी नक्कीच वाढेल.***

**प्रस्तावना (Introduction)**

अध्ययन अध्यापन प्रक्रीयेत विद्यार्थी व शिक्षकांमध्ये योग्य आंतरक्रिया सुकर होणे गरजेचे असते. कारण त्यामुळे शिक्षकांना त्यांनी दिलेल्या ज्ञानाचे मूल्यमापन करता येते व विद्यार्थ्याने ज्ञानाचे व्यवहारात उपयोजन केले की अध्ययन अध्यापन प्रक्रीया पूर्ण होते. म्हणजेच अध्ययनाची पूर्ण निष्पत्ती होते.

आपले अध्यापन कार्य अधिकाधिक प्रभावी व गुणवत्तापुर्ण कसे होईल यांचा विचार शिक्षकांने सतत करायला हवा शिक्षणक्षेत्रात विविध अध्यापन कार्यनिती, तंत्रे सुत्रे आलेली आहेत परंतू शिक्षक त्यांचा वापर किती करता यात शंका आहे जोपर्यंत शिक्षकांची स्वत:ची मनोभूमिका आणि कार्यप्रणाली बदलत नाही तोपर्यंत परिस्थिती बदलू शकत नाही. शिक्षकांला अध्यापन कार्याविषयी चिंतनशिल बनविण्याचा प्रयत्नातून उदयास आलेली आधुनिक पध्दती म्हणजे अध्यापनशास्त्रीय विश्लेषण होय.

**अध्यापनशास्त्र (Pedagogy)**

१) अध्यापनशास्त्र हे शिक्षणाचे शास्त्र व कलात्मक अंग आहे, अध्यापनशास्त्राचा विस्तार हा व्यक्तीचा सर्वांगीण विकासापासून ते व्यक्तीने कौशल्ये आत्मसात करण्यापर्यंत आहे.

Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue - V February 2015
Theme - " Pedagogy And Teaching Learning "

२) अधापनशास्त्रात अध्यापनातील विविध पध्दतीचा व विविध कृतीचा समावेश होतो.

३) अध्यापनशास्त्र हे अध्ययनासाठी असणारे अध्यापन होय.

४) अध्यापनशास्त्र हे अनुदेशनासाठी पध्दती व तत्वे यांचा संच आहे.

५) अध्यापनशास्त्र हे शैक्षणिक विषयाच्या उद्दिष्टांच्या पुर्ततेसाठी असणारे अध्यापन असुन त्यात अनेक पध्दती आणि सराव कार्याचा समावेश असतो.

६) The function or work of a teacher teaching.

७) The art or Science of teaching, education instructional methods.

**अध्ययन स्त्रोत्र (Learning Resources)**

शिक्षण पक्रियेत अध्ययन व अध्यापन महत्वाचा घटक आहे. अध्ययनामुळे व्यक्तीचा विकास होतो. विद्यार्थ्याचे अध्ययन घडते म्हणजे नवीन ज्ञान वर्तन कौशल्ये, मूल्ये आत्मसात करतो. अध्ययनाने व्यक्तीच्या वर्तनात कायम आणि टिकाऊ स्वरुपातील बदल घडून येणे अपेक्षित असते याकरिता शिक्षकाचे केलेले अध्यापन परिणामकारक व्हावयास हवे यासाठी काळानुरुप नवनवीन संशोधन होवू लागली. त्यामुळे अध्ययन प्रक्रीयेचा विकास व्हायला लागला व विद्यार्थ्याच्या अध्ययनास चालना मिळू लागली अशाप्रकारे अध्ययन स्त्रोत संकल्पना ही पुढे आली.

अर्थ - अध्ययन स्त्रोत ही संकल्पना दोन व्यापक आणि स्वतंत्र संकल्पनांनी तयार झालेली आहे म्हणजे एक अध्ययन व स्त्रोत

**अध्ययन + स्त्रोत = अध्ययनस्त्रोत**

याचा अर्थ ही केवळ गोळा बेरीज नसून अध्ययन आणि त्यासाठी आवश्यक असणारे स्त्रोतांचे अर्थपूर्ण एकत्रिकरण आहे.

अध्ययनास कारणीभुत असणारे स्त्रोत म्हणजेच अध्ययनस्त्रोत होय.

अध्ययनस्त्रोतांच्या काही व्याख्या केल्या जातात

"Learning Resources are defined as information, represented and stared in variety of medi .७ formatters that assists student learning as defined by provincial for local curricula".

**British Columbia Ministry of Education १९९८**

ज्या ज्ञान, घटक वस्तू साधने, अनूभव कृती यापासून व्यक्तींचे अध्ययन होते व अध्ययनास आधार मिळतो त्यास अध्ययन स्त्रोत असे म्हणतात.

**यावरुन,**

१) अध्ययन स्त्रोतांमध्ये मोठयाप्रमाणात अभ्यास साहित्याचा विचार असतो ज्यामध्ये अध्यापनाचा शास्त्रीय दृष्टीकोन असतो.

२) अध्ययन स्त्रोत अध्ययनकर्त्यास ज्ञान, माहिती व पुरेशी संधी आणि आधार मिळतो अशाप्रकारच्या अध्ययन स्त्रोतांमध्ये एखादा शिक्षण विभाग अध्यापक वर्ग, अनुदेशन साहित्य तंत्रज्ञान साधनसामग्री, अधारभुत सेवा इत्यादीचा विचार करता येईल.

३) तसेच अध्ययन कर्त्यास ज्ञानरचनावाद करण्यास मदत करते.

४) अध्ययन कर्त्यास माहिती संकल्पनाचे व अध्ययनाचे आकलन सहज व सुलभ करते.

**अध्यापनशास्त्र आणि अध्ययन स्त्रोत गरज व महत्व**

**१) स्पष्टता**

आपण कोणता आशय शिकविणार आहोत तो का शिकवावा आणि कसा, कोणत्या क्रमाने शिकवावा याविषयी स्पष्टता त्यासाठी अध्यापन स्त्रोताचा वापर होतो.

**२) ज्ञानसंपादन पातळी**

आशयाची सत्यता, विद्यार्थ्यांना समजावी कार्यकारणभाव, तत्वे यांचा उलगडा व्हावा म्हणून आशयाला पुरावे देणारे मुद्दे देण्याची जाणीव होते.

**३) उदिदष्टाधिष्ठित अध्यापन**

उद्दिष्ट डोळयासमोर ठेवून त्यापध्दतीने अध्यापन होते.

**४) बोधात्मक भावात्मक मनोकारक कौशल्यांचा विकास**

अध्यापनशास्त्रामुळे व अध्ययन स्त्रोतांमुळे बोधात्मक, भावात्मक, क्रियात्मक कौशल्यांचा विकास होतो.

**५) अध्ययनास उत्तेजना**

विद्यार्थी चांगल्या अध्ययन स्त्रोतांमुळे अध्ययनाकडे वळतात अध्ययन करताना जाणवणारा कंटाळवाणेपणा कमी होऊन विद्यार्थी अध्ययनास प्रेरित होतात.

**६) वेळेचे बचत**

अध्यापनशास्त्र कला व शास्त्र दोनही असून व त्यास अध्ययन स्त्रोतांची जोड मिळाल्यास वेळेचे बचत होते.

**७) चिरस्थायी अध्ययन**

अध्यापनशास्त्रात आशय व प्रत्यक्ष वर्तमान जीवन यांची सांगड घालता येते तर अध्ययनस्त्रोतांचा प्रभावी परिणामकारक वापर केल्यास अध्ययन चिरस्थायी होते.

**८) आशयाचे व अध्यापन आणि गाभाघटक**

अध्यापनशास्त्रामध्ये गाभाघटक मूल्ये याची सांगड घालून अध्ययन स्त्रोतांच्या वापर करुन त्यांचे उपयोजन करता येते.

**९) आशय व पध्दती यांचे एकात्मीकरण**

अध्यापनशास्त्रात आशय व पध्दती यांचे एकात्मीकरण साधले जावून वैशिष्टयपूर्ण अध्ययन स्त्रोतांमुळे अध्ययनाची गुणवत्ता वाढण्यास मदत होते व अध्ययन दर्जेदार घडते.

**विषय शिक्षणात अध्यापनशास्त्र व अध्ययन स्त्रोताचे उपयोजन**

**१) विद्यार्थी व शिक्षकांच्या ठायी असलेल्या घटका संबंधित पूर्वज्ञानाचा कल्पनांचा शोध लागतो**

अध्ययनस्त्रोतांचा विचार व वापर प्रभावीपणे केला तर विद्यार्थ्यांचे विज्ञान जागृती अध्यापन शास्त्रीयदृष्टया प्रभावी व परिणामकारक ठरु शकते.

**२) तंत्रज्ञानाचा वापर**

अध्यापनशास्त्रामध्ये विविध अध्ययन स्त्रोतापैकी तंत्रज्ञान हया साधनांचा वापर अध्ययन अध्यापनात प्रभावी ठरतो विद्यार्थी शिक्षक आंतरक्रिया योग्य ठरु शकतात.

**३) प्रत्यक्ष अनुभव**

अध्यापनशास्त्रामध्ये विद्यर्थ्यांना अध्ययनात प्रत्यक्ष कृती अथवा प्रत्यक्ष अनुभव दिले तर विद्यार्थ्यांच्या ते चिरस्थायी लक्षात राहते.

**४) आशयाचे अध्यापन घटकात विश्लेषण**

अध्यापनशास्त्रात आशयाचे अध्यापन घटकात विश्लेषण केल्याने विविध प्रकारच्या अध्ययन स्त्रोतांचा वापर त्यात होवू शकतो.

Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue - V February 2015
Theme - " Pedagogy And Teaching Learning "

**५) वेळेचे बचत**

नियोजन केल्याने व स्त्रोतांचा वापर करुन कमी वेळात जास्त माहिती मिळू शकते.

**६) घटनेसंबंधी कार्यकारणभावाचा शोध**

घटना, प्रसंग घटतात तेव्हा त्यात परस्परसंबंध असतो प्रत्येक घटनेला पार्श्वभुमी असते अध्ययन स्त्रोताद्वारे त्यातील कार्यकारणभाव स्पष्ट करता येईल. उदा. क्षेत्रभेट

**७) विद्यार्थ्याच्या विचाराला संधी**

अध्ययन स्त्रोतांमध्ये असलेल्या क्षेत्रभेट व सहल सारख्या स्त्रोतांचा वापर करुन अध्यापन घटकांचा व्यापक अर्थ प्राप्त होवू शकतो.

**८) सर्व वर्गाच्या अध्ययनास पोषक वातावरण निर्मिती**

अध्यापनशास्त्रामध्ये दैनंदिन अध्ययन अध्यापन अध्ययन स्त्रोतांच्या साधनांच्या साहय्याने पोषक वातावरण निर्मिती करता येईल.

**९) नवनिर्मिती**

एखादा पाठय घटकांच्या अध्यापन करित असताना अध्ययन स्त्रोतांद्वारे नवनिर्मिती करण्यात येईल.

**१०) ठरविलेली ध्येये व उद्दिष्टये यांची साध्यता**

अध्यासक्रमात ठरविलेली ध्येये व उद्दिष्टये साध्यतेसाठी अध्यापनशास्त्र व त्यातील अध्ययन स्त्रोत योग्य समन्वय घातल्यास त्यांची साध्यता निश्चितच होईल.

**समारोप**

शैक्षणिक ध्येय व उद्दिष्ट यांच्या साध्यतेसाठी विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या अध्ययन अनुभवामध्ये अध्यापनशास्त्र व अध्ययनस्त्रोत्यांच्या योग्य समन्वय साधल्यास अपेक्षित ध्येयपुर्ती होत असते विद्यार्थ्यामध्ये अपेक्षित वर्तनबदल करण्यासाठी शिक्षकाने अध्यापनसाठी कोणता व कसा विचार करावा आपणांस अध्यापन शास्त्रातुन त्यांचा अभ्यास करण्यास येईल.

**संदर्भसुची**

१) कुंडले म.बा. (१९९६),"अध्यापनशास्त्र आणि पध्दती सहावी आवृत्ती", व्हिनस प्रकाशन, पुणे

२) पारसनीस न.रा. (१९९८), "शिक्षकांचे प्रशिक्षण" नुतन प्रकाशन, पुणे.

३) पाटील संदीप (२००७), "इतिहास शिक्षण" इनसाईट पब्लिकेशन्स, नाशिक.

४) बरकले रामदास (२००२), "इतिहास शिक्षण" इनसाईट पब्लिकेशन्स, नाशिक

५) पंकज नागमोती (२०१४), "प्रगत अध्यापनशास्त्र" सात्विक प्रकाशन, नाशिक